# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 12/02/2024 (सोमवार) सकाळ


---

## कंपनीतून गैस सिलेंडर चोरी करणारे आरोपी नागपूर ग्रामीण पोलीसांच्या जाळयात

पो.स्टे. कळमेश्वरः— अंतर्गत कॉन्फीडन्स पेट्रोलियम इंडीया कंपनी लिमिटेड कंपनी रेल्वे स्टेशन कळमेश्वर येथे रात्री दरम्यान संतोष परते यांची सेक्यूरिटी सूपरवायझर म्हणून नाईट डयूटी होती. पहाटे ०३/०० वा. सूमारास संतोष यांनी फिर्यादी नामे— राजेंद्र रामरावजी भगत, वय ५० वर्षे, रा. प्लॉट नं. २, हरिओम सोसायटी, झिंगाबाई टाकळी नागपूर (कॉन्फीडन्स पेट्रोलियम इंडीया कंपनी लिमिटेड कंपनीत मैनेजर) याला फोन करून माहिती दिली कि, तिन अनोळखी ईसम खाली असलेले एक्सपायर हॉट रिपेयर १४.२ कि.ग्रॅ. खाली सिलेंडर भारत गैस कंपनीचे उचलून नेत होते. यातील दोन इसम पळून गेले व एक इसमाला पकडून त्याचे नाव पत्ता विचारले असता त्यांनी आपले नाव १) देवेंद्र गंगाधर डांगे, रा. मालेगाव ता. सावनेर असे सांगितले. कळमेश्वर पोलीसांनी तपासा दरम्यान त्याचे इतर साथीदार नामे— २) **पवण सुरेंद्र हणवते, वय २८ वर्ष, रा. मेंढकि ता. काटोल ह. मु. गुरूव्दारा सावनेर ३) अजय कुंजीलाल सरियाम वय २८ वर्ष रा. मालेगाव ता. सावनेर ४) देवेन्द्रसिग लक्ष्मणसिंग राजपुत वय २८ वर्ष, रा. झाल्डा जि. राजगड (म.प्र) ह. मु. बोरूजवाडा** यांना अटक करण्यात आली आहे हे वरील आरोपी पुर्वी अटक करण्यात आले होते परंतु यातील मुख्य आरोपी व सदरचा चोरीचा माल विकत घेणारे न भेटल्याने पोस्टे कळमेश्वर येथील डीबी पथकाने कसोशीने प्रयत्न करून यातील ०५ वा आरोपी गणेश अजाबराव कारेमोरे, वय २५ वर्ष, रा. याला व आरोपी क्र. ६) अजय हरीभाउ बावणे, वय २९ वर्ष, रा. सावनेर यांनी सदरचा मुद्देमाल विकत घेणारे आरोपींना अटक करून सदर गुन्हयातील मुद्देमाल खालीलप्रमाणे जप्त कला. गुन्ह्यात चोरीला गेलेले खाली ६७ खाली गॅस सिलेंडर किंमती १,३४,०००/— रू. चा माल जप्त केले आहे. तसेच गुन्ह्यात वापरलेली ०१ मोटरसायकल तसेच एक महिंद्रा कंपनीचा चारचाकी छोटे वाहन आरोपी कडून जप्त केले आहे.

सदरची कार्यवाही ही पोलीस अधीक्षक श्री. हर्ष पोद्दार, अपर पोलीस अधिक्षक श्री. रमेश धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन कळमेश्वर येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक योगेश कमाले, पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय कोलते, सहायक फौजदार मनोज गाढवे, सफौ धुर्वास बांबल, पोलीस नायक राजेंद्र ठाकरे यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर